# प्रकरण २ रे

# प्रवेश प्रक्रिया

## २.१ कस्तुरबा गांधी बालिका विद्यालया मधील विद्यार्थीनीची प्रवेश पात्रता व नियमावली

१. ज्या मुलीचे नाव तालुक्यातील कोणत्याही नियमित शाळेत नोंदवलेले नाही व ज्या मुलींची नोंद झटपट सर्वेक्षणामध्ये शाळाबाहय मुलगी म्हणून झालेली आहे अशा मुलीस खालील प्राधान्यक्रमानुसार प्रवेश दिला जाईल.

- अनुसुचित जमातीच्या मुली
- अनुसुचित जातीच्या मुली
- विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या मुली
- इतर मागास वर्गातील मुली
- अल्पसंख्यांक संवर्गातील मुली

२. दारिद्रयरेषेखालील मुली ज्या काही कारणामुळे शिक्षणापासून वंचीत राहिलेल्या आहे. अशा मुलींना प्रवेश दिला जाईल.

३. दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील मुलींना एकूण प्रवेश क्षमतेच्या २५ टक्केपेक्षा अधिक प्रवेश देण्यात येवू नये.

४. जिल्ह्यातील इतर तालुक्यातील एखादया गावी मुलगी आपल्या कुटुंबासमवेत नव्याने स्थालांतरीत झाली व ती शाळाबाहय असल्यास अशा मुलींना कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात प्रवेशास पात्र समजण्यात येईल. या संदर्भातील प्रमाणपत्र संबंधित गटशिक्षणाधिकाऱ्यांनी देणे आवश्यक राहील.

५. जेथे शिक्षणाची सोय उपलब्ध नाही अशा (तीन किलो मिटर परिघामध्ये शिक्षणाची सोय नसेल) एकाकी खेडे, वस्त्या, वाडयातील मुलींना प्रवेश दिला जाईल.

६. अनुसुचित जाती / जमाती, इतर मागास व अल्पसंख्यांक सोडून वर नमुद केलेल्या संवर्गातील मुलींना प्रवेश देताना ज्या मुलीचे वय १० वर्ष पेक्षा अधिक असेल अशा मुलींना प्राधान्याने प्रवेश देण्यात येइल. कमी वयोगटातील मुलींचा शक्यतो विचार करण्यात येऊ नये. परंतु असा प्रवेश देण्यात आला तर कोणत्या कारणाने प्रवेश दिला त्याची लेखी नोंद ठेवणे आवश्यक राहील.

७. अनाथ पाल्यांना प्रवेशाकरिता प्राधान्य दिले जाईल. आई किंवा वडील हयात नसलेल्या आणि पालकत्व इतर व्यक्तीकडे असलेल्या मुलींना प्राधान्य दिले जाईल.

८. एक पालक हयात (आई/वडील) असलेल्या पालकांच्या पाल्यास प्राधान्य दिले जाईल.

९. घटस्फोटीत/परित्यक्तेच्या पाल्यास प्राधान्य दिले जाईल.

१०. शारिरीक अपंगत्वामुळे अक्षम असलेल्या पालकांच्या मुलींना प्राधान्य दिले जाईल.

११. तालुक्यातील विशेष गरजा असणाऱ्या शाळाबाह्य विद्यार्थिनींना प्रवेश देण्यात यावा. या विद्यार्थिनींना समावेशित करून घेण्यासाठी त्यांना लागणाऱ्या पूरक शैक्षणिक सहाय्यभूत सेवा पुरविण्यात याव्यात.

१२. नैसर्गिक आपत्तीग्रस्त असलेल्या पालकांच्या पाल्यांना प्रवेशाकरिता प्राधान्य दिले जाईल.

१३. ज्या खेडयात, वाडीत अथवा वस्तीवर पुढील वर्ग नसल्यास पुढील शिक्षणासाठी घरापासून किमान २ कि.मी. किंवा त्यापेक्षा जास्त अंतरावर शाळा आहे परंतु जाण्यायेण्याची सोय नाही म्हणून पायी जावे लागते. आणि पावसाळयात रस्ते बंद होतात, पायी जाण्यासाठी पायवाट देखील नसते अशा दुर्गम भागातील मुलींना गावातील सरपंच, ग्रामसेवक अथवा प्रतिष्ठित व्यक्ती त्यांच्याकडून रितसर लेखी दाखला घेऊन प्रवेश देण्यात यावा.

१४. विशेषतः उच्च प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्यासाठी पौगंडावस्थेतील ज्या मुलींना शिक्षणाची सोय उपलब्ध नाही अशा मुलींना प्रवेश देण्यात यावा.
१५. ज्या गटामध्ये कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय आहे त्या गटामधून १००% प्रवेश पूर्ण होत नसल्यास दुसऱ्या गटातील प्रवेश पात्र विद्यार्थीनींना प्रवेश दिला जाईल. गट शिक्षणाधिकारी यांनी तसे प्रमाणित करणे आवश्यक राहील.
१६. शिक्षण हक्क कायदयाच्या तरतूदीनुसार विद्यार्थीनींना प्रवेश देण्यात येईल.
१७. एखादी विद्यार्थीनी काही कारणामुळे कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय सोडून गेली असेल आणि तिची परत प्रवेश घेण्याची इच्छा असेल तिला प्रवेश दिला जाईल.
१८. स्थलांतरीत कामागारांचा पाल्य एखादया कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात शिक्षण घेत असेल व पालकांच्या स्थालांतरामुळे तिला दुसऱ्या कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात प्रवेश घ्यायची इच्छा असेल तर तिला प्रवेश दिला जाईल.
१९. विद्यालयातील सर्व मुलींचे होणारे प्रवेश हे उपरोक्त संवर्गातूनच होतील याची दक्षता घेण्यात यावी. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयामध्ये इयत्ता ५ वी ते ८ वी पर्यंत १०० विद्यार्थीनीना प्रवेश देणे अनिवार्य आहे. तसेच यापेक्षा जास्त विद्यार्थीनी प्रवेशित होऊ इच्छित असल्यास त्या संदर्भातील प्रस्ताव मंजूरीसाठी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडे पाठवणे आवश्यक राहील. प्रवेशित झालेल्या सर्व मुलींची नियमित उपस्थिती १०० टक्के राहील याची जबाबदारी देखिल प्रवेश समितीवर राहिल.

मुलींचा प्रवेश हा उपरोक्त दिलेल्या नियमानुसारच प्रवेश समितीने करावा. कोणत्याही परिस्थितीत कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाच्या मुख्याध्यापिका-नि-गृहप्रमुख व इतर कोणता सदस्य वैयक्तिकरित्या त्यांच्या अधिकारात प्रवेश देणार नाही. जर अशा प्रकारचा प्रवेश दिल्याचे आढळून आल्यास असे प्रवेश रद्द केले जातील व अशा अनाधिकृतरित्या प्रवेश दिलेल्या विद्यार्थीनींवर झालेला खर्च संबंधीताकडून वसूल करण्यात येईल.

## २.२ प्रवेश पूर्व तयारी

१. गटशिक्षणाधिकारी कार्यालयामधून शाळाबाह्य विद्यार्थीनींची शैक्षणिक वर्षाची यादी माहे मार्च मध्ये मुख्याध्यापक-नि-गृहप्रमुखांनी प्राप्त करुन घ्यावी. तसेच विद्यालयातील सर्व शिक्षकांची बैठक घेऊन मुख्याध्यापक-नि-गृहप्रमुखांनी प्रवेशाचे निकष, सर्वेक्षण प्रपत्र कसे भरावे इ.माहिती द्यावी.
२. वरील यादीवरुन माहे एप्रिल मध्ये इ.५ ते ८ पर्यंतच्या शाळाबाहय मुलींची सर्वेक्षण यादी तयार करुन पालक भेट घेण्यात यावी.
३. माहे मार्च व एप्रिल मध्ये प्रवेश प्रक्रिया संबंधी माहिती दर्शविणारे बॅनर, सूचना फलक तयार करुन लोकजागृती करिता ठिकठिकाणी लावण्यात यावे. सर्वेक्षणातील मुलींच्या पालकांना विद्यालयात शासनाकडून देण्यात येणा-या लाभांची माहिती असणारे माहितीपत्रक देण्यात यावे. तसेच मुलींच्या पालकांना जात प्रमाणपत्र काढून घेण्याच्या कार्यपध्दतीबद्दल देखील मुख्याध्यापिका-नि-गृहप्रमुख यांनी पालकांना मार्गदर्शन करावे.
४. प्रवेशप्रक्रियासंबंधी सार्वजनिक ठिकाणी भिंतीवर घोषवाक्य लिहीण्यात यावे.तसेच लाऊडस्पीकरद्वारे योजनेचा गावोगावी प्रचार व प्रसार उदा. बस स्टँड, रेल्वे स्टेशन, भाजीमंडई, बसमध्ये, वर्तमानपत्रातून, शैक्षणिक दवंडीद्वारे,जाहीरात इ.सदर कालावधीत करण्यात यावा. मार्च व एप्रिल महिन्यात पालक मेळाव्याचे आयोजन करून या योजनेची व प्रवेश प्रक्रियेची माहिती पालकांना देण्यात येईल जेणे करुन पालकांमार्फत योजनेचा प्रसार होईल. अंगणवाडी कार्यकर्ती, सरपंच, ग्रामसेवक, सामाजिक कार्यकर्ते, आरोग्यसेविका, आशा, बचतगट, युवा/महिला/भजनी मंडळी यांना देखील सदर सभेस सहभागी करुन घ्यावे. याबाबतची सर्व जबाबदारी गट शिक्षणाधिकारी यांच्यावर राहील.

५. लोकचेतना प्रशिक्षणातून KGBV योजनेची माहिती देण्यात यावी.

६. विद्यालयात दाखलपात्र मुलींच्या सर्वेक्षण यादीनुसार मुख्याध्यापिकांनी काही शिक्षक विद्यालयात राहतील व काही शिक्षक पालक भेटी घेण्यासाठी गावात जातील याचे नियोजन करुन माहे एप्रिल मध्ये गावांत प्रत्यक्ष भेटी देवून प्रवेशाची निश्चिती करावी. पालकांकडून प्रवेश अर्ज भरुन घ्यावेत. याकरिता अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक, सरपंच, मुख्याध्यापक व शिक्षक, गावातील नागरिक यांचे सहकार्य घ्यावे. प्रवेशा संदर्भातील जाहिरात ग्राम पंचायत, तलाठी कार्यालयात दर्शनी भागात लावावी.

७. माहे जून मध्ये शाळा उघडल्या नंतर पूर्व तयारी वर्ग घेण्यात यावेत याकरिता मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात नियमानुसार प्रवेशपात्र मुलींची यादी तयार करण्यात यावी. मे च्या दुस-या आठवड्यात मुलींच्या प्रवेशास प्रवेश समितीची मान्यता घ्यावी व प्रवेशाची यादी कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात व गट शिक्षणाधिकारी कार्यालयात दर्शनी भागावर लावावी. तसेच ज्या पालकांच्या मुलींना विद्यालयात प्रवेश दिला जाणार आहे व ज्या पालकांच्या मुलींना निकषात न बसल्यामुळे प्रवेश नाकारला आहे अशा पालकांना मुख्याध्यापिका-नि-गृहप्रमुख यांनी मे अखेर पर्यंत पत्राने कळवावे. माहे मे मध्ये प्रवेश प्रक्रिया पूर्ण करुन १ जूनपासून विद्यालय नियमित सुरु करुन नियमित पूर्व तयारी वर्ग सुरू करण्यात यावेत.

## २.३ कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयासाठी प्रवेश समिती

**रचना :-**

| | | |
|---|---|---|
| १ | गट शिक्षणाधिकारी | अध्यक्ष |
| २ | शिक्षण विस्तार अधिकारी (संबंधित पंचायत समिती) | सदस्य |
| ३ | केंद्रप्रमुख (महिला - संबंधित) | सदस्य |
| ४ | शाळेतील पूर्णवेळ शिक्षिका (एक) | सदस्य |
| ५ | मुख्याध्यापिका-नि-गृहप्रमुख | सदस्य सचिव |

**प्रवेश समितीची जबाबदारी व कार्ये:-**

१. मार्च माहिन्याच्या अखेरीस बैठक आयोजित करण्यात येईल. या बैठकीकरिता सर्व सदस्य उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

२. प्रवेश समितीमध्ये चालू शैक्षणिक वर्षातील रिक्त होणा-या पटसंख्येची माहिती मुख्याध्यापिका-नि-गृहप्रमुख यांनी प्रवेश समितीसमोर सादर करावा.

३. सर्वेक्षण कालावधी संपल्यानंतर प्रवेश समितीची दुसरी बैठक माहे मे मध्ये घ्यावी.

४. प्राप्त झालेल्या सर्वेक्षण यादी व प्रवेश अर्जांची छाननी करुन प्रवेशपात्र मुलींची यादी तयार करण्यात यावी. आवेदन पत्रांची संख्या जास्त असेल तर संवर्गनिहाय स्वतंत्र यादया तयार करण्यात याव्यात.

५. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाच्या प्रवेशासंबधी निकष व अटीनुसार प्राधान्यक्रमांनुसार प्रवेश देण्यात यावेत.

६. प्रवेश यादी सोबतच प्रतिक्षा यादी देखिल तयार करण्यात यावी.

७. सर्वेक्षण यादी, निवड प्रवेश व प्रतिक्षा यादी मा.शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांच्याकडे सादर करण्यात यावी.

८. प्रवेश समिती करिता स्वतंत्र ठराव रजिस्टर, इतिवृत्त ठेवण्यात येईल. तसेच जी प्रवेश निश्चित यादी तयार करण्यात आली आहे. त्यावर सर्व सदस्यांच्या स्वाक्षरी असतील.

९. विद्यार्थीनींना वयानुरुप समकक्ष वर्गात प्रवेशित करण्यात येईल. शाळा सुरु होण्याचा दिनांक १ जून राहील. या तारखेपर्यंत सर्व १०० विद्यार्थींना प्रवेश देण्याची प्रक्रिया अनिवार्य राहील. पूर्व तयारी वर्ग प्रवेशित झालेल्या मुलींसाठी तातडीने सुरु करण्यात यावेत.

**संनियंत्रण : -**

कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय विद्यार्थीनीच्या प्रवेशा संदर्भात शिक्षणाधिकारी (प्राथमिक) हे संनियंत्रण करतील व नियमानुसार प्रवेश दिले जातील याची खातरजमा करतील.

## २.४ कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय

१) दाखलपात्र विद्यार्थीनी सर्वेक्षण नमुना पृष्ठ क्रमांक ९०
२) प्रवेशपूर्व नोंदणी अर्ज पृष्ठ क्र. ९१
३) प्रवेश अर्ज पृष्ठ क्र. ९२
४) पालकांचे संमती पत्र पृष्ठ क्र. ९३

## २.५ कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात प्रवेश दिल्यानंतर पालकांसाठीचे नियम

१. विद्यालयात प्रवेश घेताना प्रवेश पत्रासोबत विद्यार्थीनीचा, दोन्ही पालकांचा अथवा पालक म्हणून पालकत्व स्विकारलेल्या व्यक्तींचे प्रत्येकी एक फोटो सादर करणे आवश्यक आहे.
२. प्रवेश घेतांना पालकांनी विद्यार्थीनीस अनुवंशिक अथवा काही गंभीर आजार असेल तर त्याबद्दल सर्व माहिती मुख्याध्यापिकेस देणे बंधनकारक आहे.
३. मुलींना प्रवेश दिल्यानंतर तिला महिन्यातून फक्त पहिल्या रविवारी पालकांना भेटता येईल. अन्य दिवशी भेट देण्यात येवू नये व तशी पालकांना पूर्व कल्पना देण्यात यावी.
४. विद्यालयाने दिलेल्या सुट्टया संपल्यानंतर पालकांनी मुलींना लगेच विद्यालयात पाठवावे. अपवादात्मक परिस्थितीमध्ये विद्यार्थीनी घरी राहणार असल्यास त्यासंबंधी पालकांनी लेखी माहिती विद्यालयास कळवावी.
५. विद्यालयात नेमून दिलेल्या वेळी फोन करतांना सायंकाळी ५ ते ६ या दरम्यान आई, वडील किंवा प्राधिकृत केलेले पालक यांनीच फोन करावा व आलेल्या फोनची रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात यावी.
६. पालकांनी पाल्यास भेटीकरिता येताना कोणतेही खादयपदार्थ सोबत आणू नये.
७. दीर्घकालीन सुट्टीच्या कालावधीसाठी मुलीला घरी सोडतांना फक्त आई, वडील या दोघांपैकी किमान एकाने येणे आवश्यक आहे. आई वडील येऊ शकत नसतील तर पालकत्व स्विकारलेल्या पालकांनी मुलीचा फोटो व वडिलांचे संमती पत्र सोबत ठेवावे.

**विद्यार्थींनी भेट कार्डाचा नमूना :-**

